# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

## SUB-REGIONAL OFFICE, CHANDRAPUR

Phone: 07172-251965/272410
Fax: 07172-251965
Visit us at www.mpcb.gov.in
E-mail: srochandrapur@mpcb.gov.in

"Your Service is our Duty"

Sub-Regional Office
Udyog Bhavan, Ist Floor
Railway Station Road,
Chandrapur-442401

No. MPCB / SROC / 1264 / 2022 Date: 08 / 03 / 2022

To,
The Joint Director (WPC),
M. P. C. Board, Sion (E),
Mumbai-22.

Sub:- Minutes Of The Public Hearing For Proposed Sand Ghats (Total 70) Of Gadchiroli District.

Ref:- 1) Board's Office Order No. E-06 of 2021 dated 21/01/2022 regarding Panel.
2) Public Hearing conducted on 24/01/2022 at Collector Office, Gadchiroli.

Sir,

With reference to above cited subject matter, District Mining Officer, Gadchiroli had applied to the Board for conducting Environmental Public Hearing for their Proposed Project of Sand Ghats (Total 70) of Gadchiroli District.

The Public Hearing was conducted on 24/01/2022 at 12:00 PM at Collector Office, Gadchiroli, Tal. Dist. Gadchiroli. Submitting herewith the copies of proceedings of the Public Hearing as under;

**1)** Minutes of Public Hearing in English & Marathi (One original Copy & one photocopy).
**2)** Copies of written submissions received regarding project.
**3)** Copy of attendance sheet.
**4)** DVD of video shooting at the time of Public Hearing.
**5)** Office order for constitution of Public Hearing Panel.
**6)** Notices of Public Hearing published in English & Marathi Newspapers.
**7)** Executive Summary (English & Marathi).
**8)** EMP Report.

This is submitted for your perusal and onward submission.

Thanking you.

Yours Faithfully

(U. B. Bhadule)
I/c. Sub-Regional Officer, Chandrapur.

O/C

Copy submitted for information to:-
1) The District Collector, District Collector Office, Gadchiroli.
2) Regional Officer, M. P. C. Board, Chandrapur.
3) EIC, M. P. C. Board, Mumbai – for display on website of the Board.

Copy for information to:-
District Mining Officer, Collector Office, Gadchiroli.

DL-16/3/22

**गडचिरोली जिल्हयातीलगडचिरोली, वडसा देसाईगंज, ओरमोरी, अहेरी, भामरागड, सिरोंचा, मुलचेरा, धानोरा, चामोर्शी, कुरखेडा, तालुक्यातील प्रस्तावित असलेल्या रेतीघाटांकरिता (एकुण ७०) दि. २४/०१/२०२२ रोजी झालेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त.**

..........................................................................................................

गडचिरोली जिल्हयातील खालील तक्त्यात नमुद केलेल्या गडचिरोली, वडसा देसाईगंज, ओरमोरी, अहेरी, भामरागड, सिरोंचा, मुलचेरा, धानोरा, चामोर्शी व कुरखेडा तालुक्यातील प्रस्तावित असलेल्या रेतीघाटांकरिता (एकुण ७०) पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दि.२४/०१/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता,स्थळ-जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली, ता. जि. गडचिरोली येथे घेण्यात आली.

| **प्रस्तावित वाळू घाटाची ठिकाणे** |
|---|
| आंबेशिवणी (गायघाट), राजगाटामाल, खुर्सा, कुरखेडा (सावरगांव), कनेरी, साखरा, पोर्ला, नगरी, काटली, पारडीकुपी, पुलखल, बोदलीमाल, लांझेडा, अडपली-१, अडपली-२, आंबेशिवनी (राममंदीर घाट), दिभनाचक (जेप्रा), राजोली (नवरगांव), जैरामपूर रेतीघाट, गणपूर रै., दोटकुली, वाघोली, मोहुर्ली मो. उसेगांव, मोहुर्ली मो. रेतीघाट जिबंगांव, आमगांव म.,येला, अरसोडा, वघाळा, सायगांव, शिवणी बुज-१, देऊळगांव-१, देऊळगांव-२, शिवणी बुज, किटाळी, डोंगरसावंगी, रामपूर चक (कासवी), बनखी (चामोर्शीमाल), कुरुड (बोडेगांवघाट), कुरुड (जुनी वडसाघाट), कोंढाळा मेंढा घाट, कोंढाळा सिंड्राई,**वडसा**, **आमगांव**, **सावंगी**,कुरखेडा, कुंभीटोला, घाटी, नान्ही, आवलमारी, वट्रा (खुर्द), तिमलगुडम नाला (मेडाराम), चिपूरदूब्बा रै. नं. १ (आदिमुत्तापूर), चिपूरदुब्बा रै. नं.२ (आदिमुत्तापूर), नगरम, मद्दीकुंठा, आरडामाल, अंकिसामाल-१, अंकिसामाल-२, चिंतरवेला-१, चिंतरवेला-२, मुकडीगटा रै-१ (गुमलकोंडा रै), मुकडीगटा रै-२ (गुमलकोंडा रै), टेकडामोटला-१, टेकडामोटला-२, रेगुंठामाल-१, कोटापली, कोटामाल (गर्कापेठा), मेडाराममाल नाला, येचली, रेला (मडवेली), |

मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. BO/JD(WPC)/PH/B-२२०१२१-FTS-०१८६ दि. २१/०१/२०२२ अन्वये सदरच्या लोकसुनावणी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे.

१) श्री. संजय मीणा, भा.प्र.से.
जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली - **अध्यक्ष**

२) श्री. अ. मा. करे,
प्रादेशिक अधिकारी - **सदस्य**
म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर

३) श्री. उमाशंकर भ. भादुले,
प्रभारी उप-प्रादेशिक अधिकारी - **समन्वयक**
म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर

प्रभारी उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी मंचावरील मान्यवरांचे व उपस्थित नागरिकांचे स्वागत केले. तसेच समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीची प्रक्रिया सुरू केली.

सर्वप्रथम समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी सुचित केले की, पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दि. १४/०९/२००६ व सुधारित दि. ०१/१२/२००९ रोजीच्या अधिसुचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक संमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजित करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

गडचिराली जिल्हयातील ७० वाळुघाटांमधुन वाळुचे उत्खनन करून वाहतूक करण्यासाठी प्रकल्प प्रर्वतक जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी दि. १५/१२/२०२१ रोजी रितसर शुल्क भरुन महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्याबाबत अर्ज केला होता.

समन्वयक यांनी नमुद केले की, केंन्द्र शासनाच्या खनिकर्म विभागाने मार्च, २०१८ मध्ये Sand Mining Frame Work, २०१८ प्रसिध्द केले आहे. त्यामध्ये वाळु/रेती निर्गती करताना आवश्यक असणाऱ्या बाबी संदर्भात देशातील काही ठळक राज्यांचा अभ्यास करुन काही दिशानिर्देश दिलेले आहेत. तसेच मा. राष्ट्रीय हरित लवादने (एनजीटी) यांनी ओ.ए.नं. ३६८/२०१५ मध्ये दिनांक १९/०९/२०१८ रोजीच्या आदेशानुसार केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याशी समन्वय साधून Sustainable Sand Mining Guidelines, २०१६ व Sand Mining Framework, २०१८ व २०२० नुसार धोरणात अनुकुल बदल करण्याचे व जनसुनावणी घेण्याचे निर्देश पारित केले आहेत.

समन्वयक यांनी असे नमुद केले की, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचा मुळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणाऱ्या परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणुन घेणे, प्रकल्पास बंधनकारक असणाऱ्या प्रदुषण नियंत्रण संयत्रणा व त्याअनुषंगाने कायदे याबाबतची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सुचनांचा विचार करणे. म.प्र.नि.मंडळाकडे प्राप्त लोकसुनावणी घेण्याबाबतच्या अर्जाच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे परवानगीने दि. २४/०१/२०२२ रोजी गडचिरोली जिल्हयातील वाळुघाटांबाबत पर्यावरण विषयक लोकसुनावणी घेण्याबाबत दिनांक निश्चित करण्यात आली होती. याबाबत नियमाप्रमाणे ३० दिवस अगोदर दि. २४/१२/२०२१ रोजी मराठी दैनिक **'लोकमत'** व इंग्रजी दैनिक **'टाईम्स ऑफ इंडिया'** या वृत्तपत्रात जाहिरात प्रकाशित केली होती. तसेच अधिसुचनेप्रमाणे वाळुघाटासंबंधीचे ठळक वैशिष्ट असलेल्या व प्रकल्पाबाबत माहिती असलेल्या प्रारुप पर्यावरण व्यवस्थापन अहवालाच्या प्रती मराठी व इंग्रजी जाहिरातीत नमूद केलेल्या कार्यालयामध्ये इच्छुक नागरिकांना अभ्यास करण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या.

तदनंतर गडचिरोली जिल्हयातील ७० वाळूघाटांबाबत पर्यावरण सल्लागार श्री. निखील गणेश ओक यांनी सविस्तर अहवाल (PPT Presentation) सादर केले. तसेच वाळू उत्खनन करतांना प्रदुषण नियंत्रण करतांना घेण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत माहिती दिली.

सादरीकरणानंतर समन्वयक यांनी लोकसुनावणीसाठी उपस्थित नागरिकांना या ७० वाळुघाटांबाबत त्यांचे मत, टिका-टिपण्णी, आक्षेप, सुचना मांडण्याबाबत आवाहन केले. तसेच उपस्थित नागरिकांनी समितीकडे लेखी निवेदने सादर केली. उपस्थितांनी नोंदविलेली मते व त्याबाबतचा अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

**जनसुनावणी दरम्यान ऑनलाईन पद्धतीने व प्रत्यक्ष उपस्थित असलेल्या नागरीकांचे प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्पधारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणे आहेत:**

**ऑनलाईन:-**

१) **<u>श्री. संदीप मेश्राम, ईकोबॅलंस, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर जनसुनावणी ७० रेती घाटांकरिता आयोजित करण्यात आली आहे परंतु सादरीकरण फक्त ६८ रेतीघाटांचे देण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या कोणत्या रेती धोरणानुसार सदर जनसुनावणी आयोजित करण्यात आली आहे. तसेच ज्या रेती घाटांचे नाव मागील जनसुनावणीमध्ये वगळण्यात आले होते ती नांवे का घेण्यात आली. जर ७० रेती घाट प्रस्तावित असतील तर प्रकल्प प्रवर्तकाने ७० रेती घाटांचेच सादरीकरण द्यावे. शेवटच्या क्षणी रेती घाटांच्या संख्येत घट किंवा वाढ पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना २००६ व २००९ नूसार करता येत नाही. तसे केल्यास सदर जनसुनावणी बेकायदेशीर ठरविण्यात येते. | जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी सांगितले की, सदर जनसुनावणी ही ७० रेती घाटांची आहे. सध्या शासनाचे जुने रेती धोरण अंमलात आहे. नवीन रेती धोरणाचा शासन निर्णय प्राप्त झाल्यानंतर तो अंमलात येईल. सादरीकरण देखील ७० रेती घटांची आहे. सन २०२० च्या रेती घाटांचा अंतिम अहवालाबाबत या कार्यालयाशी संपर्क करावा. सहपत्र १ ते ७ करिता देखील या कार्यालयाशी संपर्क करावा व ते संकेतस्थळावर लवकरच टाकण्यात येईल.जिल्हा सर्वेक्षण अहवाल जिल्हा संकेतस्थळावर 1 महिन्याच्या कालावधीकरिता ठेवण्यात आला होता परंतु त्या कालावधी मध्ये 1 सुद्धा तक्रार प्राप्त झालेली नाही. तसेच जिल्हा सर्वेक्षण अहवाल अंतिम केल्यावर जिल्हा संकेतस्थळावरटाकण्यात येईल.तसेच 70 रेती घाटां पैकी 2 रेती घाट हे 1 हेक्टर पेक्षा कमी क्षेत्र फळाचे |

| | | |
|---|---|---|
| | म.प्र.नि. मंडळाने उत्तर द्यावे की त्यांनी या बाबीला परवानगी कशी दिली किंवा त्यांच्या नकळत रेती घाटांची संख्या घटविण्यात आली व पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेच्या कोणत्या नियमांनूसार सदर बाबींना मंजूरी दिली. राज्य शासनाने सन २०१९ चे धोरण रद्द केलेले आहेत. शासनाने नविन धोरण जाहीर केले नसून जुने धोरण रद्द केलेले आहेत. सन २०२० च्या रेती घाटांचा अंतिम अहवाल आजपर्यंत तयार न करण्याचे कारण देण्यात यावे. सदर अहवाल अंतिम टप्प्यात आहे किंवा कसे याबाबत माहिती द्यावी. ERM मार्गदर्शक सूचनांनूसार सहपत्र १ ते ७ उपलब्ध नाहीत. शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनूसार सहपत्र १ ते ७ संबंधित विभागाच्या संकेत स्थळावर उपलब्ध असावेत. | होते, त्या कारणास्तव 68 रेती घाट प्रस्तावित करण्यात आले आहेत.<br><br>समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, पर्यावरण,वने व वातावरणीय बदल मंत्रालय,भारत सरकार,नवी दिल्ली यांच्या दि. १४/०९/२००६ व सुधारित दि. ०१/१२/२००९ रोजीच्या अधिसुचनेनुसार सदर जनसुनावणी आयोजित करण्यात आली आहे. |
| २ | कोणत्या बेसलाईन डाटाच्या आधारे पर्यावरण व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात आला? CSR बाबतची माहिती देखील उपलब्ध नाही. आपल्या विभागाने पर्यावरण व्यवस्थापन आराखडा कोणत्या माहितीच्या आधारे तयार केला. जल प्रदुषण व वायु प्रदूषण नियंत्रणाकरिता किती निधीची आवश्यकता आहे याची माहिती आपल्या विभागास कुठून प्राप्त झाली. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, बी 2 प्रवर्ग अंतर्गत येणाऱ्या प्रकल्पांसाठी आवश्यक असलेला सर्व बेसलाईन डेटा आम्ही घेतला होता तसंच सर्व विश्लेषण अहवाल परिवेष संकेत स्थळा वरती अपलोड करण्यात येतील.<br><br>जिल्हा खनिकर्म अधिकारी, गडचिरोली यांनी सांगितले की, प्रत्यक्ष सर्वेक्षण करण्यात आले आहे. आमच्याकडे मागील ४ वर्षांची माहिती उपलब्ध होती. |
| ३ | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितल्याप्रमाणे १४.० लक्ष लिटर पाण्याचा उपसा करण्यात येणार आहे. त्याबाबतची केंद्रीय भूजल बोर्डाची परवानगी घेतलेली आहे काय? | एवढी पाण्याची आवश्यकता कुठल्याही रेती घाटा साठी ठेवण्यात आली नाहीये आणि जे पाणी रस्त्यांवरती फवारण्यात येणार आहे ते मान्यता प्राप्त कॉन्ट्रॅक्टर कडून दर दिवशी विकत घेण्यात |

| | | |
|---|---|---|
| | | येईल.अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपले आक्षेपांचे मुद्दे या कार्यालयास ईमेलद्वारे कळविण्यात यावे. |

२) **श्री. संजय, चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | रेती घाटांचे क्षेत्रफळ किती आहे. रेती घाटांचे क्षेत्र कसे अंकित करणार. क्षेत्रफळ कमी असताना व रेती उपसा जास्त याचे कारण काय? | जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी सांगितले की,सादरीकरणामध्ये रेती घाटांचे क्षेत्र फळ सांगण्यात आले आहे. खाणकाम हे निश्चित केलेल्या क्षेत्रामध्येच करण्यात येईल. रेती घाटाच्या परिसरास अंकित केले जाईल. तसेच यामध्ये प्रत्येक रेती घाटातून किती वाळू उपसा केला जाईल याची आकडेवारी देण्यात आली आहे. रेतीचे उत्खनन हे सिमांकन केलेल्या क्षेत्रातच करण्यांत येईल, याची दक्षता घेण्यात येईल. तसेच रेतीचे उत्खनन सिमांकन क्षेत्राच्या बाहेर झाल्यास योग्य ती नियमानुसार कार्यवाही करण्यांत येईल. |
| २) | सिरोंचा तालुक्यात नदीचे पात्र २-३ किमी चे आहे. तेथे मोठे रेती घाट का नाहीत? | जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी सांगितले की, गडचिरोली जिल्हयातील सिरोंचा तालुक्यातील रेतीघाट हे मोठया क्षेत्रफळाचे असल्यामुळे त्या रेती घाटाची ब्रास संख्या व ऑपसेट प्राईस मधे मोठया प्रमाणात वाढ होत असल्यामुळे मागील ३-४ वर्षापासून सिरोंचा तहसील मधील मोठे रेती घाट लिलावात जात नाहीत व त्या ठिकाणी अवैध उत्खननास वाव मिळतो, व तसेच रेतीघाट लिलावात न गेल्यामुळे महसुलात मोठया प्रमाणात घट होते, त्यामुळे जास्तीत जास्त रेती घाट लिलाव व्हावेत आणि शासनास मोठया प्रणामात रेती घाट लिलावात |

| | | |
|---|---|---|
| | | जावुन महसुल प्राप्त व्हावा या उध्देशाने सिरोंचा तहसील मध्ये फार मोठे रेती घाट ठेवण्यात आलेले नाहीत. |
| ३ | असे निदर्शनास येते की सल्लागाराने/खनिकर्म विभागाने हेतुपुरस्कर चुकीचे सर्वेक्षण केलेले आहे. | जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी सांगितले की, तालुकास्तरीय तांत्रीक उपसमितीने शास्त्रोक्त पद्धतीने सर्व रेती घाटांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. |

**३) नागरीक:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेलाअनुसरुनप्रकल्पधारकांनीदिलेलीउत्तरे/ आश्वासने |
|---|---|---|
| १) | मुलचेरा तालुक्यात अभयारण्य स्थित आहे व या तालुक्यात ०१ रेती घाट प्रस्तावित आहेत. सदर रेती घाटांमधून रेती उपसा व वाहतूक कशी करण्यात येईल? | अध्यक्ष, पर्यावरणीय जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, वन विभागाकडे या कार्यालयातर्फे पत्रव्यवहार करण्यांत आलेला असुन, वन विभागाकडून कोणत्याही प्रकारचे अभयारण्या बाबत सूचना प्राप्त झाले नाही. |

**४) श्री. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, हैदराबाद:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेलाअनुसरुनप्रकल्पधारकांनीदिलेलीउत्तरे/ आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर प्रकल्पाचे मी समर्थन करतो. जवळपास २०% रेती पावसाच्या पाण्याने वाहून जाते. मी जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांना काही बाबी सूचविण्याची परवानगी मागतो. प्रकल्प प्रवर्तकाने १० कि. मी. परिघातील नागरीकांचा आरोग्य विषयक अहवाल तयार करावा, पिक लागवड अहवाल, व भूजल उपलब्धता अहवाल तयार करावा. प्रकल्प प्रवर्तकाने सादर केलेला वृक्षारोपण अहवाल अगदी बरोबर आहे. परंतु प्रकल्प प्रवर्तकाने वृक्षारोपण करताना फळझाडे, फुलझाडे व औषधीगुणाने परिपूर्ण असलेल्या झाडांची लागवड करावी. तसेच रेती वाहतुकीच्या रस्त्यालगत वृक्ष लागवड करावी. | अध्यक्ष, पर्यावरणीय जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. तसेच आपण सुचविलेल्या बाबी बाबत दक्षता घेण्यात येईल. |

पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांनी उपस्थित असलेल्या नागरीकांना आणखी काही प्रश्न/आक्षेप/सूचना असतील तर विचारण्याचे आव्हान केले. मात्र कोणीही त्यानंतर प्रश्न/सूचना/आक्षेप उपस्थित केले नाहीत. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना जनसुनावणीतील उपस्थित झालेल्या बाबींचा आढावा घेऊन उपस्थितांचे आभार मानून जाहीर जनसुनावणी संपल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| **(उमाशंकर भ. भादुले)**<br>समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा प्रभारी उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | (अ. मा. करे)<br>सदस्य, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | **(संजय मीणा, भा.प्र.से)**<br>अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली |